बैठकीसाठी १६२

(१६२)

भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण अधिनियम, १९८५

**(सन १९८६ चा अधिनियम क्रमांक २)**

[ ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान ]

# The Agricultural and Processed Food Products Export Development Authority Act, 1985

**(Act No. 2 of 1986)**

[ *As in force on the 6th August, 2006* ]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००८

[किंमत : रुपये २७.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत दिनांक ६ ऑगस्ट २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि ॲग्रिकल्चरल ॲन्ड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्टस एक्सपोर्ट डेव्हलपमेंट ॲथॉरिटी ॲक्ट, १९८५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५, अंक २, दिनांक ९ नोव्हेंबर २००६ यात पृष्ठ १०५ ते ११५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ नोव्हेंबर २००६.

**टी. के. विश्वनाथन्,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Agricultural and Processed Food Products Export Development Authority Act, 1985 as on the 6th August 2006 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 15, dated 9th November 2006 on pages 105 to 115.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 9th November 2006.

T. K. Viswanathan,
Secretary to the
Government of India.

# कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण अधिनियम, १९८५

## कलमांचा क्रम

कलमे


प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. अनुसूचीत सुधारणा करण्याचा अधिकार.

प्रकरण दोन

**कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण**

४. प्राधिकरणाची स्थापना व घटना.

५. अध्यक्षाचे वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती आणि सदस्यांचे भत्ते.

६. अध्यक्ष हा मुख्य कार्यकारी अधिकारी असणे.

७. प्राधिकरणाचा सचिव व इतर कर्मचारी वर्ग.

८. प्राधिकरणाकडे कर्मचारी स्थानांतरित करण्यासाठी विशेष तरतूद.

९. प्राधिकरणाच्या समित्या.

१०. प्राधिकरणाची कार्ये.

११. प्राधिकरण निष्प्रभावित करण्याचा अधिकार.

प्रकरण तीन

**नोंदणी**

१२. निर्यातकांची नोंदणी

१३. नोंदणीसाठी अर्ज करणे, तो रद्द करणे, प्रदेय फी आणि नोंदणीशी संबंधित इतर बाबी.

१४. निर्यातकांनी तयार करावयाची विवरणे.

प्रकरण चार

**वित्तव्यवस्था, लेखा व लेखापरीक्षा**

१५. केंद्र सरकारकडून देण्यात येणारी अनुदाने किंवा कर्जे.

१६. कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास निधी उभारणे.

१७. प्राधिकरणाचा कर्ज घेण्याचा अधिकार.

१८. लेखा व लेखापरीक्षा.

प्रकरण पाच

**केंद्र सरकारचे नियंत्रण**

१९. अनुसूचित पदार्थांची आयात आणि निर्यात यांस मनाई करण्याचा किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार.

२०. केंद्र सरकारने दिलेले निदेश.

२१. विवरणे व अहवाल.

## प्रकरण सहा

### संकीर्ण

२२. खोटे अहवाल तयार करण्याकरिता शास्ती

२३. प्राधिकरणाच्या एखाद्या सदस्यास किंवा अधिकाऱ्यास त्याची कर्तव्ये पार पाडीत असताना अडथळे आणणे आणि लेखापुस्तके व अहवाल सादर करण्यात कसूर करणे, यांकरिता शास्ती.

२४. इतर शास्ती.

२५. कंपन्यांनी केलेले अपराध.

२६. न्यायालयाची अधिकारिता.

२७. केंद्र सरकारची पूर्वपरवानगी.

२८. सद्भावनेने केलेल्या कारवाईस संरक्षण.

२९. अधिकार सोपविणे.

३०. या अधिनियमाचे प्रवर्तन तहकूब करणे.

३१. इतर कायद्यांच्या प्रयुक्तीस आडकाठी नसणे.

३२. नियम करण्याचा अधिकार.

३३. विनियम करण्याचा अधिकार.

३४. नियम व विनियम संसदेपुढे मांडणे.

**अनुसूची**

इंग्रजी-मराठी शब्दसूची

मराठी-इंग्रजी शब्दसूची

# कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण अधिनियम, १९८५

**(१९८६ चा अधिनियम क्रमांक २)**

(६ ऑगस्ट २००६ रोजी यथाविद्यमान )

[८ जानेवारी १९८६]

**विवक्षित कृषि व संस्कारित अन्नपदार्थांच्या निर्यातीचा विकास व प्रचलन करण्यासाठी प्राधिकरण स्थापन करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या छत्तिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण अधिनियम, १९८५ असे म्हणता येईल.

(२) त्याची व्याप्ती संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "प्राधिकरण" याचा अर्थ, कलम ४ अन्वये स्थापन केलेले कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण, असा आहे ;

(ख) "अध्यक्ष" याचा अर्थ, प्राधिकरणाचा अध्यक्ष, असा आहे ;

(ग) "निर्यात" याचा अर्थ, भूमार्गे, समुद्रमार्गे किंवा हवाईमार्गे भारताबाहेर नेणे, असा आहे ;

(घ) "निर्यातक" याचा अर्थ, कलम १२ अन्वये, अनुसूचित पदार्थांचा निर्यातक म्हणून नोंदणी केलेली व्यक्ती, असा आहे ;

(ङ) "सदस्य" याचा अर्थ, प्राधिकरणाचा एक सदस्य, असा आहे आणि त्यात अध्यक्षाचा समावेश आहे ;

(च) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(छ) अनुसूचित पदार्थांच्या संदर्भात "संस्करण" या शब्दप्रयोगात, असे पदार्थ डबाबंद करणे, गोठवणे, सुकवणे, खारवणे, धुमसवणे, साल काढणे किंवा काप करणे, अशा सारख्या जतन करण्याच्या प्रक्रियेचा आणि प्राधिकरण यासंदर्भात **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा संस्करणाच्या इतर कोणत्याही पद्धतीचा समावेश होतो ;

(ज) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले विनियम असा आहे ;

(झ) "अनुसूचित पदार्थ" याचा अर्थ, अनुसूचीमध्ये समावेश केलेले कोणतेही कृषि व संस्कारित अन्नपदार्थ, असा आहे.

**अनुसूचित सुधारणा करण्याचा अधिकार.**

३. केंद्र सरकारला या अधिनियमाची उद्दिष्टे लक्षात घेऊन आणि तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे त्याला वाटले तर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अनुसूचीमध्ये कोणताही कृषि व संस्कारित अन्नपदार्थ जादा दाखल करता येईल किंवा, यथास्थिति, अनुसूचीतून वगळता येईल आणि अशा प्रकारे जादा दाखल केल्यानंतर किंवा, यथास्थिति, वगळल्यानंतर, असा पदार्थ अनुसूचित अन्नपदार्थ ठरेल किंवा तो तसा असण्याचे बंद होईल.

प्रकरण दोन

**कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण**

**प्राधिकरणाची स्थापना व घटना.**

४. (१) केंद्र सरकार, यासंदर्भात **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण या नावाचे एक प्राधिकरण स्थापन करण्यात येईल.

(२) हे प्राधिकरण, अखंड परंपरा आणि सामाईक मोहर असलेला पूर्वोक्त नावाचा निगम निकाय असेल व त्याला जंगम आणि स्थावर या दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादित करण्याचा, धारण करण्याचा आणि तिची विल्हेवाट लावण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल आणि उक्त नावाने त्याला किंवा त्याच्याविरुद्ध दावा दाखल करता येईल.

(३) प्राधिकरणाचे मुख्यालय दिल्ली येथे असेल आणि प्राधिकरणाला, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने भारतात किंवा भारताबाहेर इतरत्र कार्यालये किंवा अभिकरणे स्थापन करता येतील.

(४) प्राधिकरण पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :—

(क) केंद्र सरकारद्वारे नियुक्त करण्यात येईल असा एक अध्यक्ष ;

(ख) कृषि पणन सल्लागार, भारत सरकार, पदसिद्ध ;

(ग) नियोजन आयोगाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी केंद्र सरकारद्वारे नियुक्त करण्यात येईल असा एक सदस्य ;

(घ) संसदेचे तीन सदस्य, ज्यांपैकी दोन सदस्य लोकसभेद्वारे आणि एक सदस्य राज्यसभेद्वारे निवडून देण्यात येईल ;

(ङ) केंद्र सरकारद्वारे नियुक्त करण्यात येतील असे, केंद्र सरकारच्या, पुढील बाबी हाताळणाऱ्या त्या त्या मंत्रालयांचे प्रतिनिधित्व करणारे आठ सदस्य :—

(एक) कृषि व ग्रामविकास ;

(दोन) वाणिज्य ;

(तीन) वित्त ;

(चार) उद्योग ;

(पाच) अन्न ;

(सहा) नागरी पुरवठा ;

(सात) नागरी विमानचालन ;

(आठ) नौवहन व परिवहन ;

(च) राज्यांचे किंवा संघराज्यक्षेत्रांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी, केंद्र सरकारकडून, वर्णानुक्रमानुसार आलटून पालटून नियुक्त करण्यात येतील असे पाच सदस्य :

परंतु, या खंडान्वये करावयाची नियुक्ती ही, संबंधित राज्य शासनाच्या, किंवा, यथास्थिति, संघराज्यक्षेत्राच्या शिफारशीवरून करण्यात येईल ;

(छ) केंद्र सरकारकडून,—

(एक) भारतीय कृषि संशोधन परिषद ;

(दोन) राष्ट्रीय उद्यानविद्या मंडळ ;

(तीन) राष्ट्रीय कृषि सहकारी पणन महासंघ ;

(चार) केंद्रीय अन्न तंत्रज्ञानविषयक संशोधन संस्था ;

(पाच) भारतीय आवेष्टन संस्था ;

(सहा) मसाले निर्यात प्रचालन परिषद ; आणि

(सात) काजू निर्यात प्रचालन परिषद ;

यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नियुक्त करण्यात येतील असे सात सदस्य ;

(ज) केंद्र सरकारकडून,—

(एक) फळे व भाजीपाला उत्पादन उद्योग ;

(दोन) मांस, कुक्कुटपालन आणि दुग्धशाळा उत्पादन उद्योग ;

(तीन) इतर अनुसूचित उत्पादन उद्योग ;

(चार) आवेष्टन उद्योग.

यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नियुक्त करण्यात येतील असे बारा सदस्य :

परंतु, उपखंड (एक) ते (तीन) यांत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही उद्योग समुहाचे किंवा उपखंड (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उद्योगाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नियुक्त केलेल्या सदस्यांची संख्या कोणत्याही परिस्थितीत दोनपेक्षा कमी असणार नाही.

(झ) केंद्र सरकारद्वारे नियुक्त करण्यात येतील असे कृषी, अर्थशास्त्र आणि अनुसूचित पदार्थांचे पणन या क्षेत्रातील तज्ज्ञ व शास्त्रज्ञ यांच्यापैकी दोन सदस्य ;

(५) पोटकलम (४) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्यांखेरीज इतर सदस्यांचा पदावधी तसेच त्यांच्यामधून रिक्त पदे भरावयाची रीत आणि सदस्यांनी त्यांची कर्तव्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती विहित केल्याप्रमा असेल.

(६) प्राधिकरणाचा सदस्य नसेल अशा, केंद्र सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याची त्या सरकारद्वारे, या संदर्भात प्रतिनियुक्ती करण्यात येईल तेव्हा, त्याला प्राधिकरणाच्या बैठकींना हजर राहण्याचा व त्याच्या कामकाजात भाग घेण्याचा हक्क असेल, परंतु त्याला मतदानाचा हक्क असणार नाही.

(७) प्राधिकरणाची किंवा त्याने कलम (९) अन्वये नेमलेल्या कोणत्याही समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही,—

(क) प्राधिकरणातील किंवा अशा समितीतील कोणतेही पद रिक्त आहे किंवा ती घटित करण्यात कोणताही दोष आहे ; किंवा

(ख) प्राधिकरणाचा किंवा अशा समितीचा कोणताही सदस्य म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्तीच्या नियुक्तीमध्ये कोणताही दोष आहे ; किंवा

(ग) प्राधिकरणाच्या किंवा अशा समितीच्या कार्यपद्धतीमध्ये प्रकरणाच्या गुणवत्तेला बाध न पोहोचवणारी कोणतीही अनियमितता आहे,

याच केवळ कारणावरून विधि अग्राह्य ठरणार नाही.

(८) प्राधिकरण, विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल अशा ठिकाणी व अशावेळी बैठक घेईल आणि त्या बैठकीमध्ये, कामकाज करण्यासंबंधातील तशा कार्यपद्धतीच्या नियमांचे (बैठकीतील गणपूर्तीसह) पालन करील.

**अध्यक्षाचे वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती आणि सदस्यांचे भत्ते.**

**५.** (१) अध्यक्ष, केंद्र सरकारकडून, वेळोवेळी ठरवून देण्यात येईल असे वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असेल आणि रजा, निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी व इतर बाबतीतील तशा सेवाविषयक शर्तींच्या तो अधीन असेल.

(२) प्राधिकरणाच्या इतर सदस्यांना, केंद्र सरकार ठरवून देईल असे भत्ते मिळतील.

(३) पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त कोणत्याही सदस्याला, केंद्र सरकारला लेखी नोटीस देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि असा राजीनामा स्वीकारण्यात आल्यानंतर त्याने त्याचे पद रिक्त केले असल्याचे मानण्यात येईल.

**अध्यक्ष हा मुख्य कार्यकारी अधिकारी असणे.**

**६.** अध्यक्ष, हा प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल आणि तो, विहित केले असतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

**प्राधिकरणाचा सचिव व इतर कर्मचारी वर्ग.**

**७.** (१) केंद्र सरकार, प्राधिकरणाच्या सचिवाची नियुक्ती करील जो, विहित केले असतील किंवा अध्यक्षाने त्याला प्रदान केले असतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

(२) सचिव, केंद्र सरकार वेळोवेळी ठरवून देईल असे वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असेल आणि रजा, निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी आणि अशा इतर बाबतीतील सेवाविषयक शर्तींना तो अधीन असेल.

(३) प्राधिकरण, विहित केले असेल असे नियंत्रण व निर्बंध यांच्या अधीनतेने, त्याची कामे कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नेमणूक करील आणि प्राधिकरणाच्या अशा इतर अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची पद्धत, वेतनश्रेणी व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती, प्राधिकरण विनियमांद्वारे तरतूद करील त्याप्रमाणे असतील.

(४) प्राधिकरणाचा अध्यक्ष, सचिव आणि इतर अधिकारी व कर्मचारी या अधिनियमाखालील त्यांच्या कर्तव्यांशी असंबंधित असे कोणतेही काम, केंद्र सरकारच्या परवानगीशिवाय हाती घेणार नाहीत.

**प्राधिकरणाकडे कर्मचारी स्थानांतरित करण्यासाठी विशेष तरतूद.**

८. (१) प्राधिकरणाची स्थापना झाल्यानंतर, केंद्र सरकारने आदेशाद्वारे आणि त्यात विनिर्दिष्ट केला असेल त्या दिनांकापासून किंवा दिनांकांपासून, संस्कारित अन्नपदार्थ निर्यात प्रचालन परिषदेमध्ये (यात यापुढे जिचा निर्देश "परिषद" असा करण्यात आला आहे) प्राधिकरणाची स्थापना झाल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वी अधिकाऱ्यांचे अथवा कर्मचाऱ्याचे पद धारण करीत असलेला कोणताही अधिकारी किंवा इतर कर्मचारी यांना प्राधिकरणाकडे स्थानांतरित करणे कायदेशीर असेल :

परंतु, प्राधिकरणातील ज्या पदावर असा अधिकारी किंवा इतर कर्मचारी स्थानांतरित करण्यात आला असेल त्या पदाची वेतनश्रेणी, त्यांचे असे स्थानांतरण होण्याच्या लगतपूर्वी, तो धारण करत असलेल्या पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा कमी नसेल आणि ज्या पदावर त्याचे स्थानांतरण करण्यात आले आहे त्या पदाच्या सेवेच्या अटी व शर्ती (निवृत्तिवेतन, रजा, भविष्यनिर्वाह निधी आणि इतर वैद्यकीय लाभ यांसह), असे स्थानांतरण होण्याच्या लगतपूर्वी तो धारण करीत असलेल्या पदाच्या अटी व शर्तीपेक्षा कमी अनुकूल नसतील.

(२) पोटकलम (१) खाली दिलेला आदेश, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वीचा नसेल अशा दिनांकापासून भूतलक्षी प्रभावाने लागू होईल अशा रीतीने देता येईल.

(३) पोटकलम (१) खाली कोणताही आदेश देण्यापूर्वी, परिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना केंद्र सरकारने विहित केला असेल अशा नमुन्यात आणि त्यासंदर्भात विनिर्दिष्ट केला असेल अशा कालावधीत, प्राधिकरणाचा कर्मचारी होण्याबाबत त्यांची इच्छा आहे अथवा नाही हे व्यक्त करण्याचा विकल्प देण्यात येईल आणि एकदा अशाप्रकारे दिलेला विकल्प अंतिम असेल :

परंतु, परिषदेच्या ज्या अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने, प्राधिकरणाचा कर्मचारी न होण्याबाबतचा आपला हेतू, त्या संदर्भात विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत कळविला असेल अशा अधिकाऱ्यांच्या किंवा इतर कर्मचाऱ्यांच्या संबंधात पोटकलम (१) खालील आदेश, देण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, परिषदेच्या ज्या अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने, त्यासंदर्भात विनिर्दिष्ट केलेल्या, मुदतीत प्राधिकरणाचा कर्मचारी होण्याबाबतचा आपला निर्णय कळविला नसेल असे अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबत, परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांची संख्येत कपात करण्याच्या प्रसंगी, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी जे कायदे व स्थायी आदेश परिषदेच्या कर्मचाऱ्यांना लागू असतील त्याच कायद्यानुसार व स्थायी आदेशानुसार आणि तशाच रीतीने कार्यवाही करण्यात येईल.

(४) पोटकलम (१) खाली दिलेल्या आदेशाद्वारे कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा इतर कर्मचाऱ्याचे स्थानांतरण केल्यानंतर, असे स्थानांतरण केल्याच्या दिनांकास व तेव्हापासून, तो परिषदेचा कर्मचारी असण्याचे बंद होईल आणि तो प्राधिकरण ठरवील अशा पदनामाचा अधिकारी किंवा इतर कर्मचारी होईल आणि पोटकलम (१) च्या परंतुकातील तरतुदींना अधीन राहून, या अधिनियमान्वये प्राधिकरण तयार करील अशा परिश्रमिक व सेवेच्या इतर शर्तीच्या संदर्भातील विनियमांद्वारे, (निवृत्तिवेतन, रजा, भविष्यनिर्वाह निधी आणि वैद्यकीय लाभ यांसह), त्याचे नियमन होईल आणि प्राधिकरण त्याची सेवा रीतसर समाप्त करेपर्यंत, तो प्राधिकरणाचा अधिकारी किंवा कर्मचारी असणे चालू राहील :

परंतु, प्राधिकरण आपले अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या सेवाविषयक शर्तीचे विनियमन करण्यासाठी वर निर्दिष्ट केलेले विनियम तयार करेपर्यंत, परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांना लागू असणारे संबंधित कायदे व स्थायी आदेश त्यांना लागू असण्याचे चालू राहील.

(५) प्राधिकरणाने पारिश्रमिक, निवृत्तिवेतन, रजा भविष्यनिर्वाह निधी, वैद्यकीय लाभ यांच्यासह कोणत्याही बाबीसंबंधात तयार केलेल्या विनियमात विहित केलेल्या सेवाविषयक अटी व शर्ती, या, प्राधिकरणाकडे स्थानांतरण होण्याच्या लगतपूर्वी अधिकाऱ्याने किंवा इतर कर्मचाऱ्याने धारण केलेल्या पदाशी संलग्न असलेल्या अटी व शर्तीपेक्षा कमी अनुकूल आहेत किंवा काय याबाबत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्याबाबतीत केंद्र सरकारने दिलेला निर्णय अंतिम असेल.

**९.** (१) प्राधिकरणाला या अधिनियमाखालील त्याची कर्तव्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी व कार्ये करण्यासाठी आवश्यक असतील अशा समित्या नेमता येतील. **प्राधिकरणाच्या समित्या.**

(२) प्राधिकरणास, त्यास योग्य वाटतील अशा, प्राधिकरणाचे सदस्य नसतील इतक्या व्यक्तींना पोट-कलम (१) खाली नेमलेल्या समितीचे सदस्य म्हणून स्वीकृत करून घेण्याचा अधिकार असेल आणि अशाप्रकारे स्वीकृत करून घेतलेल्या व्यक्तींना समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्याचा व कामकाजात भाग घेण्याचा हक्क असेल, परंतु त्यांना मतदानाचा हक्क असणार नाही.

(३) पोट-कलम (२) खाली एखाद्या समितीचा सदस्य म्हणून स्वीकृत करून घेतलेल्या व्यक्ती, समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्याबद्दल केंद्र सरकार निश्चित करील असे वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असतील.

**१०.** (१) केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली अनुसूचित पदार्थांच्या निर्यातीचा विकास व प्रचालन करण्याचे काम, प्राधिकरणाला योग्य वाटतील अशा उपाययोजनांद्वारे हाती घेणे हे प्राधिकरणाचे कर्तव्य असेल. **प्राधिकरणाची कार्ये**

(२) पोट-कलम (१) मधील तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, त्यात निर्दिष्ट केलेल्या उपाययोजनांमध्ये पुढील गोष्टींची तरतूद करता येईल :—

(क) निर्यातीसाठीच्या अनुसूचित पदार्थांशी संबंधित उद्योगांचा, वित्तीय सहाय्य पुरवून किंवा अन्यथा सर्वेक्षण आणि व्यवहार्यता अभ्यास हाती घेणे, संयुक्त उपक्रमाद्वारे भाग भांडवलात सहभागी होणे आणि इतर सहाय्य व अर्थसहाय्य योजना याद्वारे विकास साधणे ;

(ख) विहित केली असेल अशी फी भरल्यानंतर अनुसूचित पदार्थांचे निर्यातक म्हणून व्यक्तींची नोंदणी करणे ;

(ग) निर्यातीच्या प्रयोजनांसाठी अनुसूचित पदार्थांची मानके व विनिर्देश निश्चित करणे ;

(घ) कोणत्याही कत्तलखान्यातील, प्रक्रिया कारखान्यातील, साठवणीच्या जागेतील, वाहनांमधील किंवा असे पदार्थ जेथे ठेवण्यात किंवा हाताळण्यात येतात अशा इतर जागांमधील मांस व मांसाहारी पदार्थांच्या गुणवत्तेची खात्री करून घेण्यासाठी त्यांची तपासणी करणे ;

(ङ) अनुसूचित पदार्थांच्या आवेष्टनात सुधारणा करणे ;

(च) अनुसूचित पदार्थांच्या भारताबाहेरील पणनव्यवस्थेत सुधारणा करणे ;

(छ) अनुसूचित पदार्थांचे निर्यातीच्या दृष्टीकोनातून उत्पादन करण्यास व विकास करण्यास चालना देणे ;

(ज) अनुसूचित पदार्थांचे उत्पादन, संस्करण, आवेष्टन, पणन किंवा निर्यात करणाऱ्या कारखान्यांच्या किंवा आस्थापनांच्या मालकांकडून किंवा विहित करण्यात येतील अशा इतर व्यक्तींकडून अनुसूचित पदार्थांशी संबंधित कोणत्याही बाबतीतील आकडेवारी गोळा करणे ; आणि अशा प्रकारे गोळा केलेली आकडेवारी किंवा तिचा कोणताही भाग किंवा त्यातील उतारे प्रसिद्ध करणे ;

(झ) अनुसूचित पदार्थांशी संबंधित उद्योगांच्या विविध पैलूंचे प्रशिक्षण देणे ;

(ञ) विहित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही बाबी.

**११.** (१) जर केंद्र सरकारचे असे मत असेल की, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्राधिकरणाकडे सोपवण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यास प्राधिकरण असमर्थ आहे किंवा ती पार पाडताना, त्यात सतत कसूर करीत आहे किंवा त्याच्या अधिकारांचे ते उल्लंघन किंवा गैरवापर करीत आहे किंवा केंद्र सरकारने कलम २० अन्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन करण्यात त्याने जाणूनबुजून अथवा पुरेशा कारणांच्या अभावी कसूर केली आहे तर, केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट केला असेल अशा कालावधीकरिता प्राधिकरण निष्प्रभावी करता येईल : **प्राधिकरण निष्प्रभावित करण्याचा अधिकार.**

परंतु, या पोट-कलमाखालील अधिसूचना जारी करण्यापूर्वी, केंद्र सरकार, प्राधिकरणाला ते निष्प्रभावित का करण्यात येऊ नये याबाबत कारणे देण्यास पुरेसा अवधी देईल आणि प्राधिकरणाची, कोणतीही असल्यास, स्पष्टीकरणे व आक्षेप विचारात घेईल.

(२) प्राधिकरण निष्प्रभावित करण्याबाबतची पोटकलम (१) खालील अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर,—

(क) प्राधिकरणाचे सर्व सदस्य, अशा निष्प्रभावित होण्याच्या दिनांकापासून त्यांचा पदावधी समाप्त होत नसला तरीही असे सदस्य म्हणून असलेली त्यांची पदे रिक्त करतील.

(ख) या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये, प्राधिकरणाकडून किंवा त्याच्या वतीने वापरण्यात येणारे सर्व अधिकार व बजावण्यात येणारी सर्व कर्तव्ये, निष्प्रभावाच्या कालावधीत, केंद्र सरकार निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून वापरण्यात आणि बजावण्यात येतील.

(ग) प्राधिकरणाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता निष्प्रभावाच्या कालावधीत, केंद्र सरकारकडे निहित होईल.

(३) पोटकलम (१) अन्वये जारी केलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला निष्प्रभावाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, केंद्र सरकारला—

(क) त्याला योग्य वाटेल, इतक्या अतिरिक्त कालावधीसाठी निष्प्रभावाचा कालावधी वाढवता येईल ; किंवा

(ख) कलम ४ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने प्राधिकरण पुनर्घटित करता येईल.

## प्रकरण तीन

## नोंदणी

निर्यातकांची नोंदणी

**१२.** (१) अनुसूचित पदार्थांपैकी कोणत्याही एका किंवा त्याहून अधिक पदार्थांची निर्यात करणारी प्रत्येक व्यक्ती, अशा निर्यातीस सुरुवात केल्यापासून एक महिना समाप्त होण्यापूर्वी किंवा हे कलम अंमलात आल्यापासून तीन महिन्यांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी यापैकी जे नंतर होईल त्यापूर्वी अनुसूचित पदार्थाची किंवा पदार्थांची निर्यातक म्हणून नोंदणी करण्यासाठी प्राधिकरणाकडे अर्ज करील :

परंतु, प्राधिकरणास, नोंदणीसाठी असलेला कालावधी, पुरेशा कारणास्तव त्याला योग्य वाटेल इतक्या कालावधीपर्यंत वाढवता येईल.

(२) एकदा केलेली नोंदणी, प्राधिकरणाने ती रद्द करीपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

नोंदणीसाठी अर्ज करणे, तो रद्द करणे, प्रदेय फी आणि नोंदणीशी संबंधित इतर बाबी.

**१३.** कलम १२ अन्वये नोंदणी करण्याच्या आणि अशा नोंदणी रद्द करण्याच्या अर्जाचा नमुना, अशा अर्जासाठी प्रदेय असलेली फी, अशा अर्जात भरावयाचा तपशील, नोंदणी करताना व ती रद्द करताना अनुसरावयाची कार्यपद्धती आणि प्राधिकरणाने ठेवावयाच्या नोंदवह्या विहित केल्याप्रमाणे असतील.

निर्यातकांनी तयार करावयाची विवरणे.

**१४.** (१) कलम १२, पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेला प्रत्येक निर्यातक, प्राधिकरणाला विहित वेळी व विहित रीतीने, विहित केली असतील अशी विवरणे सादर करील.

(२) प्राधिकरणाला, त्याच्या एखाद्या सदस्याला किंवा कोणत्याही अधिकाऱ्याला, कोणत्याही प्रक्रिया कारखान्याची किंवा निर्यातकाच्या इतर कोणत्याही आस्थापनेची, या कलमा अन्वये त्याने तयार केलेल्या कोणत्याही विवरणाची अचूकता कोणत्याही वेळी पडताळून पाहण्यासाठी प्राधिकृत करता येईल.

## प्रकरण चार

## वित्तव्यवस्था, लेखा व लेखापरीक्षा

केंद्र सरकारकडून देण्यात येणारी अनुदाने किंवा कर्जे.

**१५.** केंद्र सरकारला, संसदेने यासंदर्भात विधिद्वारे यथोचित विनियोजन केल्यानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी विनियोग करण्याकरिता केंद्र सरकारला योग्य वाटेल इतकी रक्कम प्राधिकरणास अनुदान किंवा कर्जाच्या रूपात देता येईल.

कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास निधी उभारणे.

**१६.** (१) कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास निधी नावाचा एक निधी उभारण्यात येईल, आणि त्यात पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

(क) केंद्र सरकारला संसदेने या संदर्भातील कायद्याने केलेल्या यथोचित विनियोजनानंतर, कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात उपकर अधिनियम, १९८५ यांच्या कलम ४ अन्वये जमा

करण्यात आलेल्या उपकराच्या उत्पन्नातून, उपकर गोळा करण्याचा खर्च आणि कोणतीही असल्यास, परताव्याची रक्कम वजा करून, त्या उत्पन्नातून तरतूद करता येतील अशा कोणत्याही रकमा ;

(ख) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये नोंदणीसाठी व इतर बाबींसाठी आकारण्यात व वसूल करण्यात येणारे सर्व शुल्क ;

(ग) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी कलम १५ अन्वये केंद्र सरकारद्वारे देण्यात येतील अशी कोणतीही अनुदाने किंवा कर्जे ; आणि

(घ) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, कोणतेही राज्य शासन, स्वयंसेवी संघटना किंवा इतर संस्था यांच्याकडून देण्यात येतील अशी कोणतीही अनुदाने व कर्जे :

परंतु, असे कोणतेही अनुदान, कर्जे किंवा देणगी केंद्र सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय निधीत जमा करण्यात येणार नाही,

(२) या निधीचा विनियोग,—

(क) कलम १० मध्ये निर्दिष्ट केलेल्या उपाययोजनांचा खर्च भागविण्यासाठी ;

(ख) प्राधिकरणाचे सदस्य, अधिकारी आणि यथास्थिति, इतर कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व इतर पारिश्रमिक यांवरील खर्च भागविण्यासाठी ;

(ग) प्राधिकरणाचा इतर प्रशासकीय खर्च आणि या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्राधिकृत केलेला इतर कोणताही खर्च भागविण्यासाठी ; आणि

(घ) कोणत्याही कर्जाची परतफेड करण्यासाठी,

करण्यात येईल.

**प्राधिकरणाचा कर्ज घेण्याचा अधिकार.**

**१७.** या संदर्भात करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने, प्राधिकरणास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास निधी किंवा इतर कोणत्याही मत्ता यांच्या प्रतिभूतीवर कर्ज घेण्याचा अधिकार असेल.

**लेखा व लेखापरीक्षा.**

**१८.** (१) प्राधिकरण, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी सल्लामसलत करून, केंद्र सरकार विहित करील अशा नमुन्यात योग्य लेखे व इतर संबद्ध अभिलेख ठेवील व वार्षिक लेखा विवरणपत्र तयार करील.

(२) प्राधिकरणाच्या लेख्यांची लेखापरीक्षा, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालांतराने करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेच्या संबंधात झालेला खर्च, प्राधिकरणाकडून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना देय असेल.

(३) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना आणि प्राधिकरणाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्याच्या संबंधात त्यांच्याकडून नेमण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना शासकीय लेख्यांच्या लेखपरीक्षेच्या संबंधात जे हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार असतात तेच हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार असतील आणि विशेषतः, लेखा पुस्तके, संबंधित प्रमाणके आणि इतर दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्यास सांगण्याचा आणि प्राधिकरणाच्या कार्यालयांची तपासणी करण्याचा हक्क असेल.

(४) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी प्रमाणित केलेले किंवा या संबंधात त्यांनी नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीने प्रमाणित केलेले प्राधिकरणाचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह केंद्र सरकारकडे दरवर्षी पाठवण्यात येतील व ते सरकार संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ते लेखे मांडण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण पाच

## केंद्र सरकारचे नियंत्रण

**अनुसूचित पदार्थांची आयात आणि निर्यात यांस मनाई करण्याचा किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार.**

**१९.** (१) केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूचित पदार्थांची आयात किंवा निर्यात यांस मनाई करण्यासाठी, त्यावर निर्बंध घालण्यासाठी किंवा अन्यथा त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एकतर सर्वसामान्यतः किंवा विनिर्दिष्ट प्रकरणांच्या वर्गाबाबत, तरतूद करता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये दिलेला कोणताही आदेश ज्यास लागू होत असेल असे सर्व अनुसूचित पदार्थ हे, सीमा शुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याच्या कलम ११ अन्वये ज्याच्या निर्यातीस मनाई आहे असा माल असल्याचे समजण्यात येईल आणि त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी त्यानुसार परिणामक होतील.

(३) जर कोणत्याही व्यक्तीने पोटकलम (१) खाली दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केले तर, पोटकलम (२) अन्वये लागू केलेला सीमा शुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याच्या तरतुदी अन्वये ती ज्या अधिहरणास किंवा शास्तीस पात्र असेल त्या अधिहरणास किंवा शास्तीस बाध न येऊ देता, ती व्यक्ती, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस किंवा दंडास, किंवा दोन्ही शिक्षास पात्र असेल.

केंद्र सरकारने दिलेले निदेश.

**२०.** या अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, केंद्र सरकार वेळोवेळी देईल अशा निदेशांचे, प्राधिकरण पालन करील.

विवरणे व अहवाल

**२१.** (१) प्राधिकरण, विहित करण्यात येईल किंवा केंद्र सरकार निदेश देईल अशा वेळी आणि अशा नमुन्यात व अशा रीतीने अनुसूचित पदार्थांचे प्रचालन व विकास करण्यासाठी कोणत्याही प्रस्तावित किंवा विद्यमान कार्यक्रमाबाबतचा केंद्र सरकार वेळोवेळी आवश्यक करील असा तपशील आणि अशी विवरणे व निवेदने केंद्र सरकारला देईल.

(२) पोटकलम (१) च्या तरतुदींना हानी न पोचवता, प्राधिकरण, प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस, शक्य तितक्या लवकर, केंद्र सरकारला, विहित केलेल्या नमुन्यात व अशा दिनांकापूर्वी, मागील वित्तीय वर्षातील त्याचे कार्य, धोरण व कार्यक्रम यांचा सत्य व संपूर्ण असा अहवाल सादर करील.

(३) पोटकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अहवालाची प्रत ती प्राप्त झाल्याबरोबर, शक्य तेवढ्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

## प्रकरण सहा

## संकीर्ण

खोटे अहवाल तयार करण्याकरिता शास्ती.

**२२.** या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये कोणतेही विवरण सादर करणे आवश्यक केलेली जी व्यक्ती असे विवरण सादर करण्यात कसूर करील किंवा चुकीची माहिती असलेले विवरण सादर करील आणि चुकीची असल्याचे तिला माहीत असेल किंवा ती सत्य आहे यावर तिचा विश्वास नसेल तर, ती पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र असेल.

प्राधिकरणाच्या एखाद्या सदस्यास किंवा अधिकाऱ्यास त्याची कर्तव्ये पार पाडीत असताना अडथळा आणणे आणि लेखापुस्तके व अहवाल सादर करण्यात कसूर करणे, यांकरिता शास्ती.

**२३.** जी व्यक्ती—

(क) अध्यक्षाने लेखी स्वरूपात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही सदस्यास किंवा केंद्र सरकारने अथवा प्राधिकरणाने त्यासंदर्भात प्राधिकृत केलेल्या प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास वा इतर कर्मचाऱ्यास, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये, त्याला प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करीत असताना किंवा त्याच्यावर सोपवण्यात आलेली कोणतीही कर्तव्ये पार पाडीत असताना अडथळा आणील ; किंवा

(ख) तिच्या नियंत्रणाखालील किंवा अभिरक्षेतील कोणतेही लेखापुस्तक किंवा इतर अभिलेख, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये सादर करणे आवश्यक असेल त्यावेळी असे लेखापुस्तक किंवा अभिलेख सादर करण्यात कसूर करील,

ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

इतर शास्ती.

**२४.** जी कोणी व्यक्ती, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या ज्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास कलमे १९, २२ आणि २३ मध्ये शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे अशा तरतुदींखेरीज असतील अशा तरतुदींचे उल्लंघन करीत असेल किंवा उल्लंघन करण्याचा प्रयत्न करीत असेल किंवा उल्लंघनास अपप्रेरणा देत असेल ती व्यक्ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल, आणि असे उल्लंघन करणे चालू राहिल्याच्या प्रकरणी पहिल्या दोषसिद्धी नंतरही असे उल्लंघन जितके दिवस चालू राहील त्या प्रत्येक दिवसास पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या अतिरिक्त दंडास पात्र असेल.

कपन्यांनी केलेले अपराध.

**२५.** (१) जेव्हा एखाद्या कंपनीने या अधिनियमाखाली अपराध केला असेल तेव्हा, अपराध घडला त्यावेळी कंपनीच्या कामकाज-चालनाची जी प्रभारी असेल किंवा त्याबद्दल कंपनीला जी जबाबदार असेल ती प्रत्येक व्यक्ती व तसेच कंपनीही, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास ती पात्र ठरेल ;

परंतु, अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे वाजवी तत्परता दाखविली होती, असे जर अशा कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखाद्या कंपनीने या अधिनियमाखाली अपराध केला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या समंतीने किंवा मूकानुमतीने तो अपराध करण्यात आला आहे किंवा त्याच्याकडून झालेल्या हलगर्जीपणाशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे, हे शाबीत करण्यात आले असेल तेव्हा, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हा देखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्या विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा दिली जाण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, कोणताही निगम-निकाय, असा आहे व त्यामध्ये भागीदारी संस्थेचा किंवा इतर व्यक्तीसंघाचा समावेश आहे ; आणि

(ख) भागीदारी संस्थेच्या संदर्भात " संचालक " याचा अर्थ, भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे.

**न्यायालयाची अधिकारिता.**

**२६.** महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांची न्यायचौकशी करू शकेल.

**केंद्र सरकारची पूर्वपरवानगी.**

**२७.** या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधासाठीचा खटला केंद्र सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय चालविता येणार नाही.

**सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.**

**२८.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये, सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही कारवाईबद्दल केंद्र सरकार किंवा प्राधिकरण किंवा त्याने नेमलेली कोणतीही समिती किंवा प्राधिकरणाचा अथवा अशा समितीचा कोणताही सदस्य किंवा केंद्र सरकारचा किंवा प्राधिकरणाचा कोणतीही अधिकारी किंवा अन्य कर्मचारी किंवा केंद्र सरकारने अथवा प्राधिकरणाने प्राधिकृत केलेली अन्य कोणतीही व्यक्ती, यांच्या विरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**अधिकार सोपविणे.**

**२९.** केंद्र सरकारला, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, असा निदेश देता येईल की, या अधिनियमाखाली त्याला वापरता येण्यासारखे (कलम ३२ खालील नियम करण्याचा अधिकार वगळून), कोणतेही अधिकार, त्या आदेशात विनिर्दिष्ट केले असतील अशा प्रकरणी आणि कोणत्याही असल्यास, त्या शर्तींना अधीन राहून आणि त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा अधिकाऱ्याला किंवा प्राधिकरणाला देखील वापरता येतील.

**या अधिनियमाचे प्रवर्तन तहकूब करणे.**

**३०.** (१) या अधिनियमान्वये लादण्यात आलेले काही निर्बंध लादणे बंद करणे आवश्यक आहे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल केंद्र सरकारची खात्री पटली तर किंवा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे त्याला वाटले तर, ते **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट केली असेल अशा मर्यादेपर्यंत आणि अनिश्चित कालावधीसाठी किंवा विनिर्दिष्ट कालावधीसाठी या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींचे प्रवर्तन तहकूब किंवा शिथील करू शकेल.

(२) जेव्हा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे प्रवर्तन पोटकलम (१) अन्वये अनिश्चित कालावधीसाठी तहकूब किंवा शिथील केले असेल तेव्हा हा, अधिनियम अंमलात असताना कोणत्याही वेळी, केंद्र सरकारला अशी तहकुबी किंवा शिथीलीकरण **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे काढून टाकता येईल.

**इतर कायद्यांच्या प्रयुक्तीस आडकाठी नसणे.**

**३१.** या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांच्या तरतुदींना न्यूनता आणणाऱ्या नसून त्या तरतुदींच्या जोडीला आणखी असतील.

**नियम करण्याचा अधिकार.**

**३२.** (१) केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(शा.म.मु.) एच ४१५८—३ (१०००—५-०८)

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल, त्या बाबी अशा :—

(क) [कलम ४, पोटकलम (४) च्या खंड (ख) मध्ये निर्देश केलेल्या सदस्याव्यतिरिक्त] सदस्यांचा कलम ४, पोटकलम (५) अन्वये पदावधी, रिक्त पदे भरावयाची रीत आणि सदस्यांनी त्यांची कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती :

(ख) कलम ६ अन्वये अध्यक्षाला, प्राधिकरणाचा मुख्य अधिकारी म्हणून वापरता येतील असे अधिकार व पार पाडता येतील अशी कर्तव्ये ;

(ग) कलम ७, पोटकलम (१) अन्वये प्राधिकरणाच्या सचिवाने वापरावयाचे अधिकार व पार पाडावयाची कर्तव्ये ;

(घ) कलम ७, पोटकलम (३) अन्वये, ज्यांना अधीन राहून, प्राधिकरणाकडून इतर अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती केली जाईल ते नियंत्रण व निर्बंध ;

(ङ) कलम ८ पोटकलम (३) अन्वये, संस्कारित अन्नपदार्थ निर्यात प्रचालन परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांना ज्या नमुन्यात व ज्या कालावधीत विकल्प देता येईल तो नमुना व तो कालावधी ;

(च) कलम १०, पोटकलम (२), खंड (ख) अन्वये अनुसूचित पदार्थांच्या निर्यातकांची नोंदणी करण्यासाठी प्रदान करावयाचे शुल्क ;

(छ) कलम १०, पोटकलम (२), खंड (ज) अन्वये, मालकाखेरीज इतर ज्या व्यक्तींकडून अनुसूचित पदार्थांशी संबंधित कोणत्याही बाबींसंबंधात आकडेवारी गोळा करावयाची त्या व्यक्ती ;

(ज) कलम १०, पोटकलम (२), खंड (ञ) अन्वये ज्या अतिरिक्त बाबींसंबंधात प्राधिकरणाला त्याची कार्ये पार पाडण्यासाठी उपाययोजना करावी लागेल त्या अतिरिक्त बाबी ;

(झ) कलम १३ अन्वये, नोंदणी करण्यासाठीच्या व नोंदणी रद्द करण्यासाठीच्या अर्जाचा नमुना व रीत अशा अर्जासाठी प्रदान करावयाचे शुल्क व नोंदणी मंजूर करण्यासाठी व ती रद्द करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि अशा नोंदणीचे नियमन करण्यासाठीच्या शर्ती ;

(ञ) कलम १४, पोटकलम (१) अन्वये, निर्यातकाने ज्यावेळी व ज्या रीतीने प्राधिकरणाला विवरणे सादर करावयाची ती वेळ व ती रीत ;

(ट) कलम १८, पोटकलम (१) अन्वये प्राधिकरणाचे लेखे ज्या नमुन्यात ठेवावयाचे तो नमुना ;

(ठ) कलम २१, पोटकलम (१) अन्वये प्राधिकरणाने, केंद्र सरकारला ज्या नमुन्यात व ज्या रीतीने आणि ज्या वेळी विवरणे व विवरणपत्रे सादर करावयाची तो नमुना, ती रीत व ती वेळ ;

(ड) कलम २१, पोटकलम (२) अन्वये प्राधिकरणाने, केंद्र सरकारला, त्याची कार्ये व कार्यक्रम याबाबतचा अहवाल ज्या नमुन्यात व ज्या दिनांकापूर्वी सादर करावयाचा तो नमुना व तो दिनांक ;

(ढ) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

**विनियम करण्याचा अधिकार.**

**३३.** (१) प्राधिकरणाला, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विनियम, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनांकरिता ज्यासाठी तरतूद करणे आवश्यक व इष्ट असेल अशा सर्व बाबींसाठी तरतूद करण्याकरिता करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल, त्या बाबी अशा :

(क) कलम ४ च्या पोटकलम (८) अन्वये, प्राधिकरणाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या बैठकी ज्या वेळी व ज्या ठिकाणी घेण्यात येतील ती वेळ व ते ठिकाण आणि त्या बैठकीत अनुसरावयाची कार्यपद्धती आणि बैठकीत गणपूर्तीसाठी आवश्यक असणारी सदस्यांची संख्या ;

(ख) कलम ७, पोटकलम (३) अन्वये, प्राधिकरणाचा कोणताही अधिकारी आणि इतर कर्मचारी यांच्या नियुक्तीची पद्धत, सेवेच्या शर्ती आणि वेतनमान व भत्ते ;

(ग) सर्वसामान्यतः प्राधिकरणाचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी.

(३) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्याने मंजूर केलेल्या कोणत्याही विनियमात फेरबदल करील किंवा तो विखंडित करील आणि अशाप्रकारे फेरबदल केलेला किंवा विखंडित केलेला विनिमय, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच परिणामक होईल, किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विखंडनामुळे त्या फेरबदलापूर्वी किंवा विखंडनापूर्वी विनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**नियम व विनियम संसदेपुढे मांडणे.**

**३४.** या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम व विनियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात किंवा विनियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम अथवा विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम अथवा विनियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच परिणामक होईल, किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली किंवा विनियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## अनुसूची

[कलम २ (झ) पहा]

१. फळे, भाजीपाला व त्याची उत्पादने.

२. मांस व मांसाहारी पदार्थ.

३. कुक्कुटपालन आणि कुक्कुट उत्पादने.

४. दुधाचे पदार्थ.

५. मिठाई, बिस्कीट व बेकरी पदार्थ.

६. मध, गूळ आणि साखरेचे पदार्थ.

७. कोको व त्याचे पदार्थ, सर्व प्रकारची चॉकलेट्स.

८. अल्कोहोलयुक्त व अल्कोहोलरहित पेये.

९. धान्य उत्पादने.

१० [१][***], शेंगदाणे, वाटाणा आणि अक्रोड.

११. लोणची, चटण्या व पापड.

१२. ग्वार गम.

१३. पुष्पसंवर्धन व पुष्पसंवर्धन उत्पादने.

१४. हर्बल व औषधी वनस्पती.

[२][१५. तांदूळ.]

[३][१६. खारवलेल्या ढोबळ्या मिरच्या (ग्रीन पेपर).]

---

[१] स्थायी आदेश, १८३ (ङ), दिनांक १५ फेब्रुवारी १९८८ द्वारे वगळले.

[२] स्थायी आदेश, ७३९ (ङ), दिनांक ३० ऑक्टोबर १९९१ द्वारे समाविष्ट केले.

[३] स्थायी आदेश, ७७१ (ङ), दिनांक १६ ऑक्टोबर १९९२ द्वारे जादा दाखल केले.

# कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण अधिनियम, १९८५

# THE AGRICULTURAL AND PROCESSED FOOD PRODUCTS EXPORT DEVELOPMENT AUTHORITY ACT, 1985

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अभिरक्षा | custody | [कलम २३ (ख)] |
| अनुसूचित पदार्थ | scheduled products | [कलम २ (झ)] |
| आवेष्टन | packing | [कलम १० (ज)] |
| काप काढणे | filleting | [कलम २ (छ)] |
| जतन करण्याची प्रक्रिया | process of preservation. | [कलम २ (छ)] |
| तहकूब | suspend | [कलम ३० समासटीप] |
| त्यांच्या कर्तव्यांशी असंबंधित | unconnected with their duties | [कलम ७ (४)] |
| धुमसवणे | smoking | [कलम २ (छ)] |
| निष्प्रभावित करणे | supersede | [कलम ११ समासटीप] |
| निर्यातक | exporter | [कलम २ (घ)] |
| पणन | marketing | [कलम १० (ज)] |
| पारिश्रमिक | remuneration | [कलम ८ (५)] |
| प्रक्रिया कारखाना | processing plant | [कलम १० (घ)] |
| भाजीपाला उत्पादन | vegetable products | [कलम ४(४) (ज)(घ)] |
| विखंडन | rescission | [कलम ३३ (३)] |
| संस्करण | processing | [कलम १०(ज)] |
| हस्तांतरण/स्थानांतरण | transfer | [कलम ८(१) परंतुक] |

# THE AGRICULTURAL AND PROCESSED FOOD PRODUCTS EXPORT DEVELOPMENT AUTHORITY ACT, 1985

## कृषि व संस्कारित अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण अधिनियम, १९८५

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| custody | अभिरक्षा | *[Sec. 23 (b)]* |
| exporter | निर्यातक | *[Sec. 2 (d)]* |
| filleting | काप काढणे | *[Sec. 2 (g)]* |
| marketing | पणन | [*Sec. 10 (h)*] |
| packing | आवेष्टन | [*Sec. 10 (h)*] |
| processing | संस्करण | [*Sec. 10 (h)*] |
| processing plant | प्रक्रिया कारखाना | [*Sec. 10 (d)*] |
| process of preservation | जतन करण्याची प्रक्रिया | [*Sec. 2 (g)*] |
| remuneration | पारिश्रमिक | [*Sec. 8 (5)*] |
| rescission | विखंडन | [*Sec. 33 (3)*] |
| scheduled products | अनुसूचित पदार्थ | [*Sec. 2 (i)*] |
| smoking | धुमसवणे | [*Sec. 2 (g)*] |
| supersede | निष्प्रभावित करणे | [*Sec. 33 (m.n.)*] |
| suspend | तहकूब | [*Sec. 30 (m.n.)*] |
| transfer | हस्तांतरण/स्थानांतरण | [*Sec. 8 (1) proviso*] |
| unconnected with their duties | त्यांच्या कर्तव्यांशी असंबंधित | [*Sec. 7 ( 4)*] |
| vegetable products | भाजीपाला उत्पादन | [*Sec. 4 (4) (h) (d)*] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई